# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

(नॅक अ दर्जा)

विद्यार्थी कल्याण विभाग

संचालक (का.) २४०३१३२
विद्यार्थी कल्याण विभाग २४०३१३३
फॅक्स : (०२४०) २४०३१३४, २४०३१५०
तार : बामुसिटी
Web Site : www.bamu.net
E-Mail : dsw@bamu.ac.in

डॉ. सुहास रं. मोराळे

संचालक, विद्यार्थी कल्याण
विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद - ४३१ ००४. (महाराष्ट्र)


संदर्भ क्र. : संविक/यु.म./२०१६/8938-9253 दिनांक : ०४ ऑगस्ट २०१६

**<u>अत्यंत तातडीचे</u>**

*प्रति,*
***मा. प्राचार्य,***
*सर्व संलग्नीत महाविद्यालये,*
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर*
*मराठवाडा विद्यापीठ,*
*औरंगाबाद.*

*विषय : **केंद्रीय युवक महोत्सव २०१६-१७***

***महोदय / महोदया,***

*आपणास कळविण्यास आनंद वाटतो की, २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा **केंद्रीय युवक महोत्सव श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान तुळजापूरचे श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, नळदुर्ग रोड, तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथे दि. १९ सप्टेंबर २०१६ ते दि. २२ सप्टेंबर २०१६ या दरम्यान घेण्याचे निश्चित** करण्यात आले आहे. युवक महोत्सवाची थिम **'शेतकऱ्यांच्या जीवनातील नवी उमेद'** अशी असुन आपल्या महाविद्यालयामध्ये सर्व कलाप्रकारामध्ये या थिमचे प्रतिबींब असावे. **संघप्रमुख यांचे मोबाईल क्रमांक, ईमेल आय.डी. त्वरीत या कार्यालयाच्या <u>dsw@bamu.ac.in</u> या ईमेल वरती दि. १८ ऑगस्ट २०१६ पर्यंत पाठवावे.** हा युवक महोत्सव विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व संलग्नीत महाविद्यालयांचा एकत्रित महोत्सव असणार आहे. **जे महाविद्यालय युवक महोत्सवात सहभाग नोंदविणार नाहीत, अशा महाविद्यालयाकडून रु. १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) दंड आकारण्यात येईल.***

*विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयाचे निवडक प्रतिभावान कलावंत विद्यार्थी एकत्र येवून त्यांच्या कलेचे सादरीकरण सर्वांसमोर व्हावे, त्यांना कलाभिव्यक्तीचे एक व्यापक व्यासपीठ मिळावे, विद्यार्थी कलावंतांचा परस्पराशी स्नेहभाव वाढावा व सांस्कृतिक देवाणघेवाण व्हावी. हा युवक महोत्सवाचा मूळ हेतू या मुळे साध्य होवू शकेल.*

आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाच्या संघाची प्रवेशिका सोबत जोडलेल्या '**प्रपत्र-अ**' मध्ये भरावी तसेच विविध चार विभागातील स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या स्पर्धकांची माहिती '**प्रपत्र-ब**' मध्ये भरावी.

प्रपत्र ब (चार) आणि विद्यार्थी कलावंत व संघ व्यवस्थापकाची माहिती प्रत्येकी दोन फोटोसहीत भरुन संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग यांच्या कार्यालयात **मंगळवार, दि. ०६ सप्टेंबर २०१६** पर्यंत पाठवावी. तसेच एकूण प्रवेश शुल्क कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या नावे डिमांड ड्राफ्टने पाठवावा. **निर्धारित वेळेनंतर आलेल्या प्रवेशिकांचा विचार करण्यात येणार नाही.** सदरील युवक महोत्सवाचे वेळापत्रक नंतर कळविण्यात येईल. युवक महोत्सव यशस्वी करण्यासाठी आपल्या सहकार्याची आवश्यकता आहे. आपण सर्वतोपरी सहकार्य कराल अशी खात्री आहे.

धन्यवाद.

आपला विश्वासू,

040816

**डॉ. सुहास मोराळे**
संचालक, विद्यार्थी कल्याण

सोबत :-
०१) नियम
०२) प्रवेशिका (प्रपत्र-अ)
०३) कलाप्रकार (प्रपत्र-ब-) पाच
०४) विद्यार्थी कलावंतांची माहिती
०५) संघ व्यवस्थापकाची माहिती

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

नॅक 'अ' दर्जा

## केंद्रीय युवक महोत्सव २०१६-१७

## महत्वाचे नियम

➢ **प्रवेश शुल्क :**

युवक महोत्सवामध्ये भाग घेण्याकरिता विद्यापीठाने खालील प्रमाणे शुल्क ठरविले आहे.

०१) प्रत्येक सांघिक स्पर्धेकरिता - रु. १००/-

०२) प्रत्येक वैयक्तिक स्पर्धेकरिता - रु. ५०/-

महाविद्यालयास जेवढया स्पर्धामध्ये संघ पाठवावयाचा आहे त्यानुसार प्रवेश शुल्काची रक्कम बँक ड्राफ्ट (धनादेश) द्वारे **कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद** यांच्या नावे पाठवावी.

प्रवेश शुल्काशिवाय कोणत्याही महाविद्यालयाच्या संघास स्पर्धेमध्ये भाग घेण्याची परवानगी देता येणार नाही.

➢ **स्पर्धकांची पात्रता :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विभागातील तसेच सर्व संलग्न महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना युवक महोत्सव स्पर्धेमध्ये भाग घेता येईल. विद्यार्थी कलावंत हा महाविद्यालयाचा पूर्णवेळ विद्यार्थी असावा. मात्र स्पर्धकाचे वय, स्पर्धेच्या तारखेस २५ वर्षापेक्षा कमी असावे. वय २५ वर्ष पूर्ण असल्यास स्पर्धक अपात्र ठरेल.

➢ **संघाची क्षमता :**

संघातील एकूण स्पर्धकांची संख्या ४५ पेक्षा जास्त नसावी. कोणत्याही विद्यार्थ्यास चार ते पाच वैयक्तिक किंवा सांघिक स्पर्धेमध्ये भाग घेता येऊ शकतो.

➢ **प्रवास, निवास व भोजन भत्ते :**

युवक महोत्सवातील स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांचा प्रवास व भोजन इत्यादी भत्ता या वरील खर्च संबंधित महाविद्यालय विद्यापीठाच्या नियमानुसार करतील. प्रत्येक स्पर्धकास जाण्या-येण्याचा गाडी खर्च व दैनिक भत्ता नियमाप्रमाणे देण्यात यावा. निवासाची व्यवस्था संयोजकातर्फे केली जाईल.

➢ **वक्तृत्त्व स्पर्धा :**

वक्तृत्त्व स्पर्धेचा विषय संघप्रमुखांच्या बैठकीत जाहीर करण्यात येईल.

➢ **शोभायात्रा :**

शोभायात्रा राहणार नाही याची नोंद घ्यावी.

➢ **स्पर्धेसंबंधीचे इतर नियम :**

- महाविद्यालयातील विद्यार्थी कलावंत, संघातील सदस्यांनी गैरवर्तणूक केल्यास त्यांच्यावर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
- स्पर्धेसाठी आवश्यक चित्रकला साहित्य, संगीत वाद्ये, नाटकासाठी लागणारे साहित्य, विद्यार्थी कलावंतांनी सोबत आणावे.
- प्रत्येक कलाप्रकारातील पहिली तीन पारितोषिके काढण्यात येतील.
- परीक्षकांनी दिलेले निर्णय अंतिम असुन सर्व स्पर्धकांवर ते बंधनकारक राहतील.
- ग्रामीण संघासाठीचा उत्कृष्ट संघ पुरस्कार ग्रामपंचायत असलेल्या ठिकाणच्या महाविद्यालयास देण्यात येईल.
- स्पर्धेच्या ठिकाणी स्पर्धेसाठी रिपोटिंग घोषणा झाल्याच्या १५ ते २० मिनिटांत करावे, आणि आपला सादरीकरणाचा क्रमांक आयोजन समितीकडुन घेऊन आपली कला सादर करावी. तीन वेळा संघाचा नंबर घोषित करण्यात येईल, तिसऱ्या कॉल नंतर येणाऱ्या संघाला सादरीकरणासाठी विद्यापीठ युवक महोत्सव आयोजन समितीची परवानगी घ्यावी लागेल अन्यथा तो कलाप्रकार सादर करता येणार नाही.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

नॅक 'अ' दर्जा

## केंद्रीय युवक महोत्सव २०१६-१७

## प्रवेशिका (प्रपत्र - अ)

महाविद्यालयाचे नाव व पत्ता : ______________________________

______________________________ जिल्हा : ______________

**महाविद्यालयाचे दूरध्वनी क्रमांक :** ______________________________

## कलाप्रकारनिहाय महाविद्यालयाचा सहभाग :

| अ. क्र. | स्पर्धा | स्पर्धकांची संख्या | साथी-दार | स्पर्धेचा वेळ | सहभाग होय / नाही |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | ०२. | ०३. | ०४. | ०५. | ०६. |
| **संगीत विभाग :** | | | | | |
| ०१. | शास्त्रीय गायन | १ | २ | १२ ते १५ मि. | |
| ०२. | उपशास्त्रीय गायन | १ | २ | ८ ते १० मि. | |
| ०३. | शास्त्रीय तालवाद्य | १ | २ | १२ ते १५ मि. | |
| ०४. | शास्त्रीय सूरवाद्य | १ | २ | १२ ते १५ मि. | |
| ०५. | सुगम गायन (भा.) | १ | २ | ४ ते ६ मि. | |
| ०६. | सुगम गायन (पा.) | १ | २ | ४ ते ६ मि. | |
| ०७. | समूह गायन (भा.) | ६ | ३ | ८ ते १० मि. | |
| ०८. | समूह गायन (पा.) | ६ | ३ | ८ ते १० मि. | |
| ०९. | लोक वाद्यवृंद | ९ | ३ | ७ ते १० मि. | |
| **नृत्य विभाग :** | | | | | |
| १०. | लोक / आदिवासी नृत्य | १० | ५ | ८ ते १० मि. | |
| ११. | शास्त्रीय नृत्य | १ | ३ | १२ ते १५ मि. | |
| **नाटय विभाग :** | | | | | |
| १२. | एकांकिका (मराठी / हिंदी) | ९ | ३ | २५ ते ३० मि. | |
| १३. | प्रहसन | ६ | ३ | ८ ते १० मि. | |
| १४. | मिमिक्री | १ | - | ४ ते ५ मि. | |
| १५. | मूकअभिनय | ६ | २ | ४ ते ५ मि. | |